# मातृदिनाच्या शुभेच्छा

## रहस्यमयी मातृशक्ती

~ गुरुमाई चिद्विलासानंद

**आई**

अद्भुत! असाधारण! शिक्षिका!

सदैव उपस्थित! साकार रूप कौशल्यपूर्णतेचे!

हे असेच आहे

एका आईचे अस्तित्वच परिभाषित होते

उत्कृष्टपणे विकसित तिच्या गुणांनी :

सन्मानपूर्वक, प्रतिसाद देण्यास तत्पर असणे

दृढतापूर्वक, लवचीक असणे व पुन्हा सावरणे

*यापलीकडे शोधण्याची गरज नाही*

ती तिथे तुमच्यासोबत आहे

ती इथे तुमच्यासोबत आहे

*यापलीकडे शोधण्याची गरज नाही*

ती तिथे तुमच्यासोबत होती

ती इथे तुमच्यासोबत होती

*यापलीकडे शोधण्याची गरज नाही*

ती तिथे तुमच्यासोबत राहील

ती इथे तुमच्यासोबत राहील

याबद्दल विचार करा :

तुमच्या गरजांविषयी संवेदनशील असणे हे एका आईला ठाऊक असते

तिला ठाऊक असते

तुम्ही विचारपूर्वक केलेल्या कार्यांची प्रशंसा करणे
तुमच्या जीवनाविषयी तळमळ असणे
तुम्हाला बहरण्यासाठी प्रोत्साहित करणे
तुम्हाला या समजूतीने सशक्त करणे की
तुम्ही स्वतःची कथा लिहित असताना
तुमच्या आत्मशक्तीचा सुगंध
सदैव तुम्हाला वेढून असतो.

तुमची आई *तुम्हाला* जाणते
तुमची शुभचिंतक तुमच्याबद्दल सर्वकाही जाणते
आणि प्रत्येक परिस्थितीत ती तुमचा स्वीकार करते
मग तुमचा सामना यशाशी होत असो वा अपयशाशी
तिला निर्विवादपणे हेच ठाऊक असते :
तुमच्यावर प्रेम करणे, माझ्या प्रियजनहो
ती तुमचे खळखळून हसणे ऐकते आणि तुमच्या हर्षोल्लासाचा
सोहळा साजरा करते
ती तुमच्या आतल्या आत दबलेल्या हुंदक्यांचा आवाज ऐकते
आणि तिचे हृदय विस्तृत होते
तिच्या ऊबेमध्ये तुम्हाला वेढून घेण्यासाठी
तुमच्या व्यथेचे शमन करण्यासाठी
आणि वेदनाशामक ऊर्जेने तुमचा अभिषेक करण्यासाठी.

एक आई जेव्हा काहीतरी चांगले पाहते,
तेव्हा तुम्हाला ते मिळावे अशी कामना ती करते
तुमची आई जेव्हा हे पाहते की तुम्ही स्वतःला
एका भयावह परिस्थितीत अडकवून घेतले आहे
किंवा तुमच्यावर दुर्दैवाचा घाला पडला आहे
तेव्हा तिची पहिली प्रतिक्रिया काय असते?
तुम्ही सुखरूप आणि सुरक्षित असावे यासाठी ती गुडघे टेकून,
नतमस्तक होऊन प्रार्थना करते

एक आई जेव्हा प्रार्थनेच्या प्रकाशात स्नान करत असते
तेव्हा त्या प्रार्थनेचे फळ सर्वप्रथम तुम्हालाच प्राप्त होते
*ते तुमच्यासाठी असते, ते तुमच्यासाठी असते, ते तुमच्यासाठी असते*
एका आईचे हृदय हे सदासर्वदा मजबूत असते, ते सदैव अढळ राहते
त्या वेळी, जेव्हा ती तुमच्यासाठी त्याहूनही अधिक आशीर्वाद
मिळवत असते
जितके की तुम्हाला तुमच्या संपूर्ण जीवनात आवश्यक असतील
ती रात्रंदिवस तुमच्याविषयी विचार करत असते
ती तुमच्यासाठी एक ठोस दावा करू शकते
ती तुमची सर्वात जोशपूर्ण वकील आहे
तुम्हाला माहीत नाही का
की तुम्ही याबाबतीत तिच्यावर पूर्णपणे भरवसा ठेवू शकता की
ती तिच्या मैत्रीपूर्ण स्वभावाद्वारे
पर्वताएवढ्या तुमच्या समस्यांवर मात करण्यास
तुम्हाला मदत करेल?
तिचे प्रेम तुमच्या चेतनेत प्रखरतेने झगमगते आहे
जर तुम्ही एखाद्या संरक्षक देवदूताचा शोध घेत असाल तर,
*यापलीकडे शोधण्याची गरज नाही.*

होय, एक आई आंतरिक प्रेरणेने भरलेली असते
तिला अशा अंतर्जात शक्तीचे वरदान प्राप्त आहे की तुमच्या
सर्व चांगल्या कार्यांचा आणि अप्रिय प्रवृत्तींचा दरवळ
ती नेमका ओळखते
तिला तिच्या जबाबदारीची चांगल्या प्रकारे जाणीव असते,
मग ती तुम्हाला तुमच्या आनंदाच्या परमोत्कर्षावर पाहो
अथवा ती तुम्हाला तुमच्या वेदनेच्या अथांग
सखोलतेत बुडालेले पाहो
तिच्यापाशी विशुद्ध धीरता असते
तुम्हाला सल्ला देण्यासाठी आणि
तुमच्याकरिता मदतीचा हात पुढे करण्यासाठी

मी तुम्हाला हे सांगते, साहसी लोकहो :
एका आईच्या अथक प्रेमाविना,
तुमचे जीवन उजाड आणि नीरस असेल.

तुमच्यासाठी असलेल्या तुमच्या आईच्या इच्छा विरोधाभासी वाटू शकतात
तिची ही इच्छा असते की तुम्ही एक अतुलनीय मनुष्य बनावे,
त्याचबरोबर तिची इच्छा असते की तुम्ही
इतरांप्रति सद्भावना ठेवावी,
त्यांच्या यशाची प्रशंसा करावी,
आणि त्यांच्या सद्भाग्याने आनंदित व्हावे
ईर्षा आणि लोभ हे काही मुकुटमणी नाहीत
की जे तुम्ही धारण करावेत असे एका आईला वाटते
तिला वाटते की तिच्या मुलाने त्या लोकांना आलिंगन द्यावे
ज्यांच्या नशिबात तिच्या मुलासमान
अनुकूल परिस्थिती नाहीत.

ही एक गॅरंटी आहे :
एक आई तिच्या पदावरून कधीच निवृत्त होत नाही
ती अविरतपणे स्वतःचे प्रभुत्व टिकवून ठेवते,
परंतु स्वतःची ओळख बनवण्यासाठी नव्हे
हीच गोष्ट तर तिला इतके विलक्षण,
इतके अजिंक्य बनवते
असे काहीतरी आहे ज्याची ती निडर शत्रू आहे
आणि त्याला म्हणतात
‘काम अर्ध्यावर सोडून देणे’.

मातृदिन साजरा करणे म्हणजे तुमचे हृदय आणि आत्मा
यांच्या सखोलतेत पाहणे
आणि ते सर्व चमचमणारे खजिने बाहेर काढणे
जे तुमच्या अस्तित्वाच्या कानाकोपऱ्यांमध्ये

आणि भेगांमध्ये दडलेले आहेत
ते मौल्यवान, जीवनदायी खजिने
कदाचित तुमच्या अंतश्चक्षूलाही दिसणार नाहीत
तरीदेखील, ज्याप्रमाणे एका वनामध्ये सूर्याची किरणे
घनदाट वृक्षांच्या मधून जमिनीवर विखुरतात,
त्याचप्रमाणे, चौकस दृष्टीमध्ये निश्चितच ही क्षमता असते की
तिथे जे आहे त्यावर प्रकाश टाकावा,
चांगल्या गोष्टींवरदेखील आणि वाईट गोष्टींवरदेखील
तोपर्यंत, जोपर्यंत तुम्ही ते विपुल खजिने शोधून काढत नाही
जे तुमच्या आईने तुम्हाला प्रदान केले आहेत
तुमच्या आईच्या प्रेमाने तुमच्या
मनाला, हृदयाला आणि आत्म्याला सबळ बनवले आहे
जेणेकरून तुम्ही या उद्यमाची सुरुवात करावी,
आणि आपत्ती, अपयशे, अडचणींना
तसेच अपेक्षित व अनपेक्षित घटनांना पार करावे
तिने तुमच्या अंतरी अतिशय खोलवर हे गुण पेरले आहेत
समस्त चांगुलपणा, संपूर्णता आणि असामान्य योग्यता
जे *तुम्ही* आहात—
म्हणजेच हे ज्ञान की तुम्ही विशुद्ध प्रेमाचे रूप आहात,
मग यामुळे काहीही फरक पडत नाही की
तुम्ही धर्माच्या आधारे कोणते संबंध
निर्माण केले आहेत,
तुम्ही स्वतःविषयी खरी वा खोटी कोणकोणती मते
बनवली आहेत
आणि तुमच्या व्यक्तिमत्वाला कोणकोणत्या गोष्टींनी
तेव्हापासून प्रभावित केले आहे
जेव्हापासून तुम्ही आईच्या पदराचा
आश्रय सोडला आहे.

तुम्ही जेव्हा हताश, निराश होता
तेव्हा कदाचित तुम्ही अनेक वेगवेगळ्या गोष्टींकडे,
अनेक वेगवेगळ्या लोकांकडे वळत असाल,
जे तुम्हाला हवा असलेला एकांत देऊ शकतील आणि
तुम्हाला प्रोत्साहन देऊ शकतील
मी तुम्हाला एक गोष्ट सांगू का :
तुम्ही तुमच्या अंतरी प्रवेश करून
ती रत्ने आणि खजिने शोधणार नाही का
जे तुमच्या आईने तुमच्या अंतरी काळजीपूर्वक ठेवले आहेत
इतक्या परिश्रमाने, इतक्या स्नेहाने, इतक्या दक्षतेने ?

तुमच्या जीवनात तुम्ही कदाचित अनेक मित्र बनवाल
तुम्ही रात्री कदाचित लक्षावधी तारे पाहाल
तुम्ही कदाचित अफाट पैसा कमवाल
तुमच्यासमोर कदाचित अनेक छानछान गोष्टी येतील
तुम्ही कदाचित अनोळखी लोकांसमवेत हास्यविनोद कराल
तुम्हाला कदाचित हे जग अतिशय मोहक वाटेल
तुम्ही ज्ञानाचा आणि आत्मगौरवाचा विकास करण्यासाठी कदाचित
स्वतःला प्रशिक्षित कराल
तुमच्याकडे कदाचित हजारो तासांचा वेळ असेल
परंतु, माझ्या आत्मीय जनहो, मी तुमच्यासमोर एक रहस्य प्रकट करते आहे :
कुठल्याच गोष्टीशी तुलना होऊ शकणार नाही,
एका आईच्या सुमधुर दृष्टीची,
तिच्या कनवाळू आधाराची,
अगदी तिथेच, तुमच्या पेशींमध्ये तिच्या असण्याची
जिथून ती तुमची निगराणी करत असते
आणि जिथे ती श्वास घेत असते
तुमच्यासमवेत,
तुमच्यासाठी.

एक आई कोण असते याचे वर्णन करण्याच्या अनेक पद्धती असू शकतात
तुमच्याकडे हा विशेषाधिकार आहे की तुम्ही तिच्या उत्तम गुणांचे
स्तुतिगान करावे,
ज्या गुणांसाठी तुम्ही तिचे ऋणी आहात
आणि तुमच्याकडे हा विशेषाधिकार आहे की
तुम्हाला अनुशासनबद्ध ठेवणाऱ्या तिच्या कार्यांविषयी तुम्ही
तुमचा असंतोष व्यक्त करावा
परंतु सर्वकाही बोलून-ऐकून झाल्यानंतर,
तिचे ते मनमोहक अलौकिक स्मितच असते ज्याचा विजय होतो
आईसमान कोणीच नाही
आणि *तुमची* आई सगळ्यांपेक्षा वेगळी आहे
या सुंदर ग्रहावर
माता जरी असंख्य असल्या
तरी तुमची आई तुम्हाला सर्वात प्रिय आहे,
तिलाच तुम्ही तुमच्या हृदयात विशेष स्थान दिलेले आहे
अहेतुक प्रेमाने,
मग तुम्ही हे जाणत असाल वा नसाल
काही असे क्षणदेखील येतात जेव्हा,
अचानक,
तुम्हाला असे सुयोग्य ज्ञान मिळते
जे तुम्ही तुमच्या परिस्थितीला लागू करू शकता
आणि यामुळे तुम्हाला स्वतःचा अभिमान वाटतो
त्या क्षणांमध्ये,
एक श्वास घ्या.
अंतरी खोलवर पाहा.
तुमच्या अंतरातून काय उद्‌भवते?
हे अभिज्ञान
की ही आईची *आजीवन टिकणारी* भेट आहे तुमच्यासाठी—
आई तुम्हाला अंतर्ज्ञानाचा शोध घ्यायला शिकवते
आणि ते ज्ञान आचरणात आणायला शिकवते

जेणेकरून तुम्ही पुन्हा योग्य मार्गावर यावे
अशा प्रकारे, तुम्ही एक उद्देशपूर्ण जीवन जगायला शिकता
तुमची आई तुमच्यासाठी जे करते
ते इतर कोणीही कधीच करू शकणार नाही
तथापि, या जगात अनेक प्रकारच्या माता आहेत
आणि अनेक असे लोक आहेत ज्यांनी तुमच्यासाठी
एका आईची भूमिका बजावली असेल
खरे सांगायचे तर,
जी कोणती व्यक्ती
मातृत्वाच्या दायित्वाचा अंगीकार करते
ती व्यक्ती या रहस्यमयी मातृशक्तीने अनुप्राणित होते
या शक्तीचे सामर्थ्य
शब्दांमध्ये व्यक्त केले जाऊ शकत नाही.

प्रत्येक आई ही तिला उपलब्ध असलेल्या धैर्याच्या कोशाची कवाडे उघडो
प्रत्येक आईला वैकुंठीय किरणांकडून बळ प्राप्त होवो
प्रत्येक आईला लोकांचा दयाळूपणा मिळो
आणि तिच्या कुटुंबासाठी तिला जे सर्वकाही करावे लागते
त्याचीदेखील लोकांना जाणीव असो
प्रत्येक आई आश्वस्त राहो
की तिचे प्रेम हे तिच्या मुलांच्या हृदयांना स्पर्श करते
प्रत्येक आई तिच्या मुलांच्या प्रेमामृताचे रसास्वादन करो
आणि त्यांच्या प्रशंसेचा पुरस्कार तिला प्राप्त होवो
प्रत्येक आईला असे आढळून येवो की तिच्या आजूबाजूचा परिसर
हा सौंदर्याने शोभायमान आहे
प्रत्येक आई सुखाच्या आणि स्वातंत्र्याच्या संपदेसह जगो
प्रत्येक आईला याचे ज्ञान असो की तिच्या उपस्थितीमुळे
एक कायमचा ठसा उमटतो
आणि या जगात तिचे असणेच एक गौरवपूर्ण गोष्ट आहे

***

सर्व मातांच्या मातेचे स्तुतिगान महादेवीच्या रूपात केले जाते
या, आपण रहस्यमयी मातृशक्तीचा सन्मान करू या
या, आपण देवीच्या नावाचे संकीर्तन करू या
जी एका मातेच्या रोमारोमांत वास करते

निरञ्जनी अन्नपूर्णेश्वरी।
जगदीश्वरी परमेश्वरी।
कात्यायनी नमोऽस्तु ते॥

हे देवी!
तू निरंजनी आहेस, अर्थात तू निर्मळ आणि परम शुद्ध आहेस.
तू भरणपोषण करणारी आणि विपुलतेची देवी, अन्नपूर्णेश्वरी आहेस.
तू या ब्रह्मांडाची महासम्राज्ञी देवी, जगदीश्वरी आहेस आणि तू परादेवी परमेश्वरी आहेस.
तू अंतरीच्या रिपूंचा नायनाट करणारी महादेवी कात्यायनी आहेस.
हे परमेश्वरी देवी, मी तुला नमन करतो.

© २०२५ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.